प्रेसनोट दिनांक २०/०४/२०२२

कर्जत पोलीस स्टेशन, जि. रायगड येथील महिला सहा. पोलीस निरीक्षक व पोलीस नाईक यांच्या विरुध्द लाचेची कारवाई केलेबाबत,

| | | | |
|---|---|---|---|
| १. | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | :- | ॲन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई |
| २. | पोलीस ठाणे दैनंदिनी नोंद क्रमांक | :- | कर्जत पोलीस स्टेशन, रायगड स्टेशन डायरी २७/२०२२ वेळ १८:४४ वा. दिनांक २०/०४/२०२२ |
| ३ | आरोपीचे नाव हुद्दा वर्ग व कार्यालयाचा पत्ता | :- | १) श्रीमती सुनिता शंकर अथने, महिला सहायक पोलीस निरीक्षक,<br>२) श्री. सचिन पमू नरूटे, पोलीस नाईक/१२०७,<br>दोन्ही नेमणूक कर्जत पोलीस स्टेशन, रायगड |
| ४. | लाचेची मागणी रक्कम | :- | रू. १,००,०००/- ची मागणी करून तडजोडीअंती रू. ५०,०००/- |
| ५. | स्विकारलेली रक्कम | :- | रू. ५०,०००/- |
| ६ | थोडक्यात हकिगत | :- | यातील तक्रारदार यांचे सासू सासरे, मेहूणे व इतर यांच्याविरूध्द कर्जत पो.स्टे. गु.रजि. नं. १०९/२०२२ अन्वये गुन्हा दाखल आहे. सदर गुन्हयात तक्रारदार यांच्या ३ मेहूण्यांना अटक करण्यात आली असून त्यांना न्यायालयीन कोठडी आदेशित करण्यात आली आहे. कर्जत पोलीस स्टेशन येथील लोकसेविका सुनिता अथने, महिला सहायक पोलीस निरीक्षक यांनी तक्रारदार यांचे ३ मेहूणे यांना जामीन मिळण्यासाठी मदत करणेकरीता तसेच गुन्हयातील इतर पाहिजे असलेले १२ जणांना गुन्हयात अटक न करता नोटीस देवून सोडण्यासाठी तक्रारदार यांच्याकडे एक लाख रूपये रक्कमेची मागणी करून तडजोडी अंती रू. ५०,०००/- लाचेच्या रक्कमेची मागणी करून त्यापैकी रू. १०,०००/- रक्कम स्विकारली असल्याबाबत तक्रारदार यांनी दिनांक १९/०४/२०२२ रोजी असीबी, नवी मुंबई कार्यालयात तक्रार दिली होती.<br>दिनांक १९/०४/२०२२ रोजी पंचासमक्ष करण्यात आलेल्या लाचेच्या मागणीच्या सत्यता पडताळणी कारवाई दरम्यान वरील नमुद लोकसेविका सुनिता अथने, महिला सहायक पोलीस निरीक्षक यांनी तक्रारदार यांच्याकडे एक लाख रूपये रक्कमेची मागणी करून तडजोडी अंती रू. ५०,०००/- लाचेची रक्कम मागणी केल्याचे निष्पन्न झाले आहे.<br>त्याप्रमाणे दि. २०/०४/२०२२ रोजी सापळा कारवाई दरम्यान लोकसेविका सुनिता अथने यांच्या अपप्रेरणेनुसार लोकसेवक श्री. सचिन पमू नरूटे, पोलीस नाईक/१२०७, कर्जत पोलीस स्टेशन, जि. रायगड यांनी तक्रारदार यांच्याकडून रू. ५०,०००/- लाचेची रक्कम कर्जत पोलीस स्टेशन येथे स्विकारल्यानंतर लोकसेवक नं. २ यांना दिनांक २०/०४/२०२२ रोजी १३:१५ वा. पंच साक्षीदार समक्ष रंगेहाथ पकडण्यात आले व लोकसेविका सुनिता अथने यांना ताब्यात घेतले आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहान करण्यात येते की, भ्रष्टाचारा संबधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवकांविरूध्द तकार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, ठाणे परिक्षेत्र, ठाणे यांचेशी संपर्क करावा.

---

संपर्क पत्ता :- ला.प्र.वि.ठाणे, मध्यवर्तीकारागृहासमोर, ठाणे पश्चिम, ४००६०१
संकेत स्थळ :- acbmaharashtra@mahapolice.gov.in
ई मेल :- spacbthane@ mahapolice.gov.in
ऑनलाईन तकार :- acbmaharshtra.net
ॲप्लीकेशन :-
टोल फ्री नंबर :- १०६४
दुरध्वनी कमांक :- ०२२-२०८१३५९८/२०८१३५९९/२७८३३३४४
व्हॉटस्ॲप कमांक :- ९९३०९९७७००

उप अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई

शिवराज बेंद्रे
पोलीस निरीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई

Scanned with CamScanner